# मेट्रो-३ला वेग

**प. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

**पाच-सहा महिन्यांत कामास प्रारंभ**

गिरगाव-काळबादेवीतील पुनर्वसनाचा प्रश्न आणि आरे कॉलनीतील कारडेपोच्या वादात सापडलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ प्रकल्पाच्या कामाला आगामी पाच ते सहा महिन्यात प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. दरम्यानच्या काळात सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमआरसीसी) युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या असून स्टेशन तसेच मेट्रो मार्गाच्या भुयार बांधणीसाठी मागवण्यात आलेले टेंडर अंतिम टप्प्यात आहेत.



गिरगाव आणि काळबादेवीतील ६५० कुटुंबांच्या पुनर्वसनाचे गाडे मार्गी लावण्यासाठी एमआरसीसी सल्लागाराची नियुक्ती करणार आहे. त्या माध्यमातून पुनर्वसनाचा ठोस पर्याय स्थानिकांना उपलब्ध करून देऊन त्यांचा विश्वास संपादन केला जाणार आहे. या भागातील अनेक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गेली अनेक वर्षे रखडला आहे. मेट्रो ३ च्या निमित्ताने हा प्रश्न मार्गी लागण्याची संधी निर्माण झाली असून त्यासाठी लोकांना आश्वस्त करणारा पर्याय देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे एमआरसीसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले. जगभरात जिथे मेट्रो मार्ग आहेत, त्या परिसरातील लोकांचे जीवनमान उंचावले आहे, तसेच मेट्रो जात असलेल्या भागाचे महत्त्व वाढून स्थानिकांच्या घरांच्या किंमतीतही वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मेट्रो हा फक्त वाहतुकीच्याच नव्हे, तर लोकांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, असे भिडे म्हणाल्या.

स्थानिकांचे त्याच भागात पुनर्वसन व्हावे, यासाठी एमआरसीसीकडे अन्य काही पर्यायही आहेत. परंतु सध्या तरी लोकांच्या पसंतीस उतरेल, असा व्यवहार्य पर्याय देण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. आगामी काळात पुनर्वसन तसेच मेट्रो कारशेडचा प्रश्न सुटून येत्या पाच ते सहा महिन्यात मेट्रोच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.